# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/ 1081 दिनांक : १८ नोव्हेंबर, २०००

**परिपत्रक क्र.५२**

विषय : पाणी पुरवठा योजनांचा प्राधान्यक्रम निश्चित करणेबाबत.

वरील विषयाबाबत अनेक वेळा आपल्या समवेत तसेच आपल्या अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर बैठका घेवून चर्चा झाल्या आहेत. याच संदर्भात तुमच्याकडून योजनानिहाय आढावा घेवून प्राधान्यक्रम निश्चित करुन माहिती पाठविण्यात आली आहे ती प्राप्त झालेली आहे.

मंत्री महोदयांच्या स्तरावर ज्या बैठका होतात त्यामधूनही मंत्री महोदय सातत्याने उपलब्ध होणारा निधी हा अधिकाधिक किफायतशीर पध्दतीने वापरुन लाभार्थींना जास्तीत-जास्त शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्याचे उद्दिष्ट गाठण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून योजना राबविल्या जाव्यात हे सांगत असतात. ज्या ठिकाणी १) दूषित अशुध्द पाणी प्राप्त होत आहे. २) दरडोई अपुरा (१५ ते २० लीटर किंवा त्यापेक्षा कमी ) पाणी पुरवठा होत आहे ३) प्रगतीपथावरील योजना ७५% किंवा त्याहून अधिक राबविली गेली आहे व ती पूर्ण केल्याने लाभार्थींना शुध्द व पुरेसे पाणी मिळेल व ४) गेली अनेक वर्षे सातत्याने गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे, अशा सारखी परिस्थिती असेल त्या ठिकाणच्या योजनांना सर्वसाधारणपणे पहिल्या किंवा दुसऱ्या प्राधान्यक्रमामध्ये स्थान मिळाले असणार. अशा योजनांवरचा यापुढे उपलब्ध होत जाणारा निधी अत्यंत काळजीपूर्वक व दक्षतेने वापरुन अधिकाधिक जनतेला शुध्द व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर ठेवणे अत्यावश्यक ठरणार आहे.

अपेक्षित निधीच्या उपलब्धतेबाबतच्या परिस्थितीची अनेक वेळा सविस्तर व सर्व बाजूंनी चर्चा झालेली आहे. तुम्ही सर्व जबाबदार व अनुभवी अधिकारी असून पुन्हा -पुन्हा त्याच विषयी चर्चा करणे योग्य ठरणार नाही. परंतू काही वेळा मंत्री महोदयांबरोबरील चर्चेत किंवा लोकप्रतिनिधीं बरोबरील चर्चेत कार्यकारी अभियंता किंवा अधीक्षक अभियंता अजूनही बोलताना पुरेशी परिपंक्वता दाखवित नाहीत. त्यामुळे हे परिपत्रक निर्गमित करीत आहे.

आपण आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांबरोबर वारंवार बसून जिल्हावार योजनानिहाय आढावा सातत्याने घेत राहणे अत्यावश्यक आहे. योजनानिहाय आढावा घेत असताना मागील परिच्छेदात नमूद केलेली प्राधन्यक्रम ठरविण्याची मार्गदर्शक तत्वे तंतोतंत पाळली जात आहेत की नाही हे पहाणे आवश्यक आहे. एखादया योजनेवर कमी खर्च झाला आहे परंतु त्या योजनेतील गावी दूषित पाणी किंवा अपुरा/अत्यल्प पाणी पुरवठा अशी परिस्थिती असली तर स्वाभाविकच त्या योजनेचा पहिल्या किंवा दुसऱ्या प्राधान्यक्रमाने अंमलबजावणीसाठी घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी तसा अहवाल पाठवून प्राधान्यक्रम घेण्यास हरकत नाही. मार्गदर्शक तत्वात नमूद केल्याप्रमाणे एखादी योजना नव्याने तयार करणे आवश्यक असल्यास किंवा निविदा बोलाविण्याची आवश्यकता असल्यास तसा अहवालही पाठवून त्यावर मंजूरी घेतल्यास चालू शकते. या गोष्टी अजूनही अधिकाऱ्यांना अस्पष्ट असल्याचे जाणवते. उपलब्ध होत असलेल्या निधीमध्ये आपल्या समोरील उद्दिष्ट गाठावयाचे आहे ही गोष्ट सर्वांना स्पष्ट होणे आवश्यक आहे.

....२....

ज्या ठिकाणी पुरेसे दरडोई पाणी आजही मिळत नाही त्या ठिकाणी योजनेची पुनर्आखणी जुलै, २००० मध्ये शासनाने निर्गमित केलेल्या धोरणात्मक सूचनांप्रमाणे करुन घेणे अत्यावश्यक आहे. तशा सूचना यापूर्वीच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने व शासनाने दिलेल्या आहेत. परंतू त्याची दखल घेतलेली दिसत नाही. अशा कितीतरी योजना अंमलबजावणी खाली आहेत की, ज्यामध्ये आज रोजी दरडोई ३० ते ३५ लीटरच्या आसपास पाणी पुरवठा होत आहे. त्या परिस्थितीत शक्य तेथे सदर योजनेची पुनर्आखणी जुलै,२००० च्या मार्गदर्शक धोरणात्मक निर्णयाप्रमाणे केली पाहिजे अशा सूचना अधिकाऱ्यांना देणे आवश्यक आहे. ज्या योजना प्रगतीपथावर आहेत त्या योजनासुध्दा या नवीन मार्गदर्शक तत्वांप्रमाणे दरडोई ४० लीटर, १५ वर्षाची लोकसंख्या व सिंगल व्हिलेज स्किम या कल्पनेप्रमाणे विचार करुन थोडी फार जरी पुनर्आखणी करता आली तरी काही निधीमध्ये निश्चितपणे बचत होईल आणि त्यामधून दुसऱ्या प्राधान्यक्रमाच्या योजनांना निधी पुरविण्यात येईल . हे विचार अद्याप अनेक अधिकाऱ्यांपर्यंत पोहचलेले दिसत नाहीत. तरी आपण आपल्या स्तरावरुन तसेच अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, यांच्या स्तरावरुन अशा ज्या योजनांमध्ये पुनर्आखणी शक्य आहे तिथे ती अजून करुन घ्यावी.

हे काम मुख्य अभियंता स्तरावरुन जास्तीत-जास्त लक्ष देवून त्याचप्रमाणे तुमचे नेतृत्व व कल्पकता याचा पूर्ण उपयोग करुन करणे अत्यावश्यक वाटते. तसेच लोकप्रतिनिधी किंवा अन्य बिगर शासकीय व्यक्तिबरोबर चर्चा इत्यादी करताना 'निधी नाही ' असे चित्र न दाखविता जो उपलब्ध होणारा निधी आहे त्यामध्ये अत्यावश्यक व अत्यंत आवश्यक स्वरुपाची जास्तीत-जास्त कामे करण्याचा मनोदय वारंवार स्पष्ट झाला पाहिजे. पूर्वीच्या काळात ज्या योजना घेतल्या गेल्या आहेत त्या अनेक ठिकाणी अनावश्यक व अवाढव्य, न पेलणाऱ्या स्वरुपाच्या आहेत याची खात्री आजपर्यंत सर्वांनाच पटलेली आहे. तेंव्हा उपलब्ध होणाऱ्या निधीमधूनच योग्य प्रकारे योजना राबविल्या जाव्यात हा विचार कोणालाही पटवून दिल्यास पटण्यासारखाच आहे. परंतू तसे प्रयत्न निम्नस्तरावर होताना दिसत नाहीत.

सबब, वरील परिच्छेदात नमूद केलेले सर्व विचार आपण कृपया पूर्णपणे आत्मसात करुन त्यासाठी निम्नस्तरावरील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उप अभियंता स्तरावरील अभियंत्यांबरोबर वेळोवेळी आढावा घेवून योग्य रितीने प्रसृत करावेत. त्यामुळे या पुढील काळात उपलब्ध होत जाणाऱ्या निधीमधून गरजांवर आधारित शुध्द व पुरेसे पाणी पुरवावयाचे उद्दिष्टांशी संलग्न व संयुक्तिक पुरेसे प्रयत्न अशा योजनांना गती देवून सुरु राहतील. मात्र त्यासाठी तुमच्या वैयक्तिक स्तरावर अधिकाधिक प्रयत्न अपेक्षित आहेत.

वरील सूचनांमध्ये आपल्याला काही संदिग्धता वा अडचणी वाटत असतील तर माझ्याशी दूरध्वनीवर आपण बोलावे. मात्र भविष्यकाळात कोणत्याही बैठकीत किंवा कोणत्याही चर्चेत उप अभियंता स्तरापासून अधीक्षक अभियंता स्तरापर्यंत याबाबत अज्ञान दिसून येता कामा नये.

(सुरेश साळवी)
सदस्य सचिव

प्रत : सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.(नांवाने)
सर्व अधीक्षक अभियंता, ,म.जी.प्रा.,यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता, ,म.जी.प्रा.,यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.